Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: २८ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ९ ऑक्टोबर २०१८ ते सोमवार १५ ऑक्टोबर २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ नवी मुंबईत बेकायदा बाजारांमुळे वाहतुक कोंडी

कृपाशंकर-निरूपम यांच्यात जुंपली, ४

# आम्ही देवेंद्र फडणवीसांना राजकारणात आणलं -गडकरी

**नागपूर (विशाल कारंडे)-** मी आणि मुख्यमंत्री घराणेशाहीपासून दूर आहोत, असं केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग आणि जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी म्हणाले. ते नागपुरात बोलत होते. राजकारणात येण्याआधी अनेकजण समाजाच्या विकासाच्या गोष्टी करतात. पण एकदा निवडून आले की बहुतेकजण समाजाला विसरतात. मग घराणेशाही सुरु होते, असं गडकरी म्हणाले.मात्र या सगळ्या घराणेशाहीपासून मी आणि मुख्यमंत्री दूर आहोत. कारण त्यांची मुलगी लहान आहे आणि माझ्या कुटुंबात कोणीही राजकारणात येण्यास इच्छुक नाही, असं गडकरींनी नमूद केलं. नागपुरात आयोजित करण्यात आलेल्या गोर बंजारा मेळाव्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाला राज्याच्या कानाकोपऱ्यातून बंजारा बांधव उपस्थित होते.मुख्यमंत्र्यांचे वडील राजकारणात होते. मात्र त्यांनी मुलाला राजकारणात



आणलं नाही. तर आम्ही त्यांच्या वडिलांना विनंती करुन देवेंद्र यांना राजकारणात आणलं, असंही नितीन गडकरी यांनी सांगितलं.देवेंद्र फडणवीसांच्या वडिलांच्या नेतृत्त्वात मी काम केलं. त्यांच्या आई-वडिलांनी मला सांगितलं नव्हतं की माझ्या मुलाला तिकीट द्या. त्यांच्या घरी मी आणि छोटू भय्या नारकर म्हणून आमचे कार्यकर्ते होते, दोघे मिळून गेलो होतो. वडील आजारी होते. मी त्यांना सांगितलं की देवेंद्रला राजकारणात पाठवा. आम्हाला त्यांना महापालिकेचं तिकीट द्यायचं आहे. त्यावर ते म्हणाले मला काही अडचण नाही, पण त्यांच्या आईला आणि स्वत: देवेंद्रला विचारा. त्यांची तयारी असेल तर त्यांनी जावं. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांचे वडील आमदार होते म्हणून तिकीट मिळालं नाही. तर जनता, कार्यकर्ते आणि पक्ष त्यांच्या घरी गेले आणि देवेंद्र फडणवीस यांना राजकारणात आणलं.अशी परिस्थिती राजकारणात असेल तर चालेल, पण केवळ आई-वडील राजकारणात कोणत्या पदावर आहेत म्हणून मुलाला तिकीट द्यावं हे चालणार नाही.

# उदयनराजेंनी रिपाइंकडून लढावं -रामदास आठवले

**मुंबई (सम्यक कासारे)-** सातारा लोकसभा मतदारसंघातून उदयनराजे भोसले यांच्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विरोधाचे सूर आहेत. त्यातच आता रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे (रिपाइं-आठवले गट) नेते रामदास आठवले यांनी उदयनराजेंना ऑफर दिली आहे. 'सातारा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीकडून उमेदवारी न मिळाल्यास रिपाइंकडून लढावं,' अशी ऑफर आठलेंनी दिली आहे. रामदास आठवले मुंबईत बोलत होते.'उदयनराजेंना राष्ट्रवादी काँग्रेसचं तिकीट मिळण्याची शक्यता धूसर आहे. त्यांच्या जागी श्रीनिवास पाटील यांना तिकीट मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी उदयनराजेंना विनंती करतो त्यांनी आमच्या पक्षात यावं. आम्ही उदयनराजेंना निवडून आणू,' असं आठवले म्हणाले. तसंच यासंदर्भात त्यांना फोन करणार असल्याचंही आठवलेंनी सांगितलं.आगामी निवडणुकीसाठी शिवसेनेने स्वबळाचा नारा दिला आहे. 'मात्र शिवसेनासोबत आल्यास लोकसभा निवडणुकीसाठी आम्ही दोन जागांची मागणी



करणार आहे. शिवसेना सोबत आली नाही तर चार जागांची मागणी करणार आहे,' असं रामदास आठवले यांनी सांगितलं. 'तसंच युती झाल्यास पालघर लोकसभेची जागा शिवसेनेला आणि मला दक्षिण-मध्य मुंबईची जागा देण्यास काही हरकत नाही,' असंही आठवले म्हणाले.इंदू मिलमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या उंचीवरुन वाद सुरु आहे. त्याबाबत आठवले म्हणाले की,'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून पुतळ्याच्या उंची वाढवण्याबाबत बोलणार आहे. ६ डिसेंबरला मुख्यमंत्र्यांना बोलवण्यात येणार आहे. तेव्हा कामाला सुरुवात होईल. आंबेडकरांचा पुतळा २६० फुटांचा असून त्याचा बेस ९० फुटांचा आहे. या स्मारकाचं काम २०२० पर्यंत पूर्ण होईल.'मॅटने पदोन्नतीमधील आरक्षण बेकायदेशीर असल्याचं सांगत राज्यातील १५४ फौजदारांच्या नियुक्तीला स्थगिती दिली. याबाबत बोलताना रामदास आठवले म्हणाले की, 'बढतीमधील आरक्षणाचा निर्णय राज्य सरकारने घ्यावा असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे.

# उत्तर भारतीयांनी कामबंद केल्याने मुंबई ठप्प होणार नाही

**मुंबई (हर्षद परब)-** काँग्रेस मुंबई अध्यक्ष संजय निरुपम यांच्या उत्तर भारतीयांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. उत्तर भारतीयांनी मुंबईत काम बंद केलं तर मुंबई ठप्प होईल हे मान्य नाही, असं केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी संजय निरुपम यांच्या वक्तव्यावर बोलातान म्हटलं.आठवले पुढे म्हणाले की, 'निरुपम यांनी मराठी भाषिक आणि उत्तर भारतीयांमध्ये वाद निर्माण करू नये. असा वाद निर्माण करून काँग्रेसला काही फायदा होणार नाही. याउलट अशा विधानांनी मराठी भाषिकांच्या नाराजीचा काँग्रेसला फटका बसण्याची जास्त शक्यता आहे.'उत्तर भारतीयांचे मुंबईसाठीचं योगदान मोठं आहे, यात दुमत नाही. मात्र त्यांनी कामबंद केल्यानं मुंबई ठप्प होईल हे मान्य नसल्याचं रामदास आठवले यांनी सांगितलं. नागपुरात उत्तर भारतीयांच्या वार्षिक सभेत बोलताना निरूपम म्हणाले की, 'लक्षात ठेवा उत्तर भारतीय वर्ग महाराष्ट्र चालवतो... मुंबईला चालवतो... दूध, भाजी, वर्तमानपत्र विकून आणि ऑटो टॅक्सी चालवून उत्तर भारतीय समाजच मुंबईकरांचे जीवन चालवितो... उत्तर भारतीय



समाज स्वतःच्या खांद्यावर मुंबईकरांचे ओझे वाहतो... जर एके दिवशी उत्तर भारतीयांनी ठरवलं की आज कामावर जायचं नाही आणि फक्त एक दिवस काम केलं नाही तर पूर्ण मंबई ठप्प होईल... मुंबईच्या लोकांना जेवायलाही मिळणार नाही... आमची तशी इच्छा नाही... मात्र त्यासाठी आम्हाला मजबूर करू नका,' अशी धमकीच संजय निरुपम यांनी दिली.

# पापणी लवण्यापूर्वी चोरी, पापणी उघडेपर्यंत चोर पकडला!

**नागपूर (केदार वाजे)-** सराईत चोरट्याने पापणी लवण्यापूर्वी चोरी केली, पण त्यापेक्षा दोन पावलं पुढे असलेल्या पोलिसांनी, अवघ्या २६ सेकंदात चोर पकडण्याची कमाल केली. अतिशयोक्ती वाटावी अशी घटना नागपुरात घडली.जर एखादा चोर चोरी केल्यानंतर अवघ्या २६ सेकंदात पकडला जात असेल तर तुम्ही त्याला काय म्हणणार? कदाचित तो तुम्हाला अनुभवहीन चोर वाटेल. मात्र, हा शातीर चोर त्याच्या अनुभवहीनतेमुळे नव्हे तर नागपूर रेल्वे स्टेशनवरील इंटिग्रेटेड सीसीटीव्ही सर्व्हिलन्स सिस्टिममुळे काही सेकंदातच आरपीएफच्या जाळ्यात अडकला आहे. नागपूर रेल्वे



स्थानकावर शनिवारी संध्याकाळी सव्वा पाचच्या सुमारास सुनील राय नावाचा शातीर चोर दाखल झाला आणि इकडे तिकडे फिरू लागला. रेल्वे प्रोटेक्शन फोर्सच्या जवानांनी त्याला इंटिग्रेटेड सीसीटीव्ही सर्व्हिलन्स सिस्टमवर पाहताच त्याच्यावर नजर ठेवणे सुरु केले. थोडावेळ इकडे तिकडे घुटमळल्यानंतर, सुनील राय एका झोपलेल्या प्रवाशाच्या बाजूला जाऊन बसला. त्यानंतर त्याने मोठ्या शिताफीने झोपलेल्या प्रवाशाच्या पँटच्या मागच्या खिशातून त्याचं पाकीट काढलं आणि तिथून निघून गेला.हा सर्व प्रकार आरपीएफचे जवान सीसीटीव्हीत पाहात होते.

# विराट, शिखर आणि रोहित या खेळाडूंच्या पत्नींमध्ये पेटला वाद

**मुंबई (अमोल गुडेकर)-** भारतीय टीममध्ये सध्या वाद सुरु असल्याच्या चर्चा आहेत. इंग्लंड दौऱ्यादरम्यान विराट कोहलीची पत्नी अनुष्का शर्मा आणि शिखर धवनची पत्नी आयशा यांच्यात वाद झाला. यानंतरच शिखर धवनला टीममधून बाहेर केल्याची देखील चर्चा आहे. पण इंग्लंडमधील टेस्ट सीरीजनंतर शिखर धवनने आशिया कपमध्ये चांगली कामगिरी केली होती.आशिया कपमध्ये विराट कोहलीला विश्रांती देण्यात आली होती. एका रिपोर्टनुसार विराट कोहलीची पत्नी अनुष्का शर्माचा रोहित शर्माची पत्नी ऋतिका सजदेह आणि शिखरची पत्नी आयशा मुखर्जीसोबत वाद सुरु आहे. यामुळेच धवन आणि रोहित शर्माचा इंडिज विरुद्ध सिरीजसाठी संघात समावेश न केल्याचं देखील बोललं जात आहे. पण याबाबत अजून कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.विराट कोहलीने पत्रकारांशी बोलतांना म्हटलं होतं की, टीममध्ये खेळाडूंचा समावेश ही निवड समिती करते. त्याच्या या वक्तव्याला देखील या प्रकरणाशी जोडून पाहिलं जात आहे.

# अनैतिक संबंधातून मित्रावर कोयत्यानं वार

**सिंधुदुर्ग (योगेश होळंब)-** अनैतिक संबंधातून मित्रावर कोयत्यानं वार करून त्याचा हात धडापासून वेगळा केल्याप्रकरणी सिंधुदुर्गातील दोडामार्ग तालुक्यात घडली आहे. गेल्या तीन चार दिवसांपासून पोलिसांना आरोपी गुंगारा देत होता. अखेर पोलिसांनी त्याला शोधून काढलं आणि अटक केली. मंगेश गवस असं आरोपीचं नाव आहे. गुरुवारी रात्री घडलेल्या या प्रकारनंतर आरोपीनं वापरलेला कोयता अद्याप पोलिसांना सापडलेला नाही.मणेरी तळेवाडी येथे मुंबईहून मानलेल्या बहिणीकडे आलेल्या युवकाचा हात त्या मानलेल्या बहिणीच्या नवऱ्यानेच तोडल्याचे उघड झाले. युवकाचे पत्नीशी असलेल्या अनैतिक संबंधातून हा प्रकार घडल्याचे पोलीस तपासात उघड झाले.

# शिक्षणमंत्र्यांच्या जिल्ह्यातच सर्व शिक्षा अभियानाची ऐशीतैशी

**नांदेड (सुनील आढाव)–** 'सारे शिकूया, पुढे जाऊया' हे ब्रीदवाक्य घेऊन सर्व शिक्षा अभियान सर्वत्र राबवले जात आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरवली जातात. मात्र अर्धे शैक्षणिक वर्ष संपत आलं तरी शिक्षणमंत्र्यांच्या सिंधुदुर्गात अनेक विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकच मिळाली नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.शालेय शैक्षणिक वर्ष सुरू होऊन चार महिन्यांचा कालावधी उलटला आहे. तर अनेक शाळांमध्ये प्रथम सत्र परीक्षेपर्यंतचा अभ्यासक्रम देखील शिकवून झाला आहे. मात्र कासार्डे माध्यमिक विद्या मंदिरमधील पाचवी ते आठवीच्या ८५९ विद्यार्थ्यांना पुस्तकच मिळाली नसल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. त्यामुळे असंख्य विद्यार्थ्यांना शाळा सुरू झाल्यापासून पुस्तकाविनाच शिकण्याची नामुष्की ओढावली आहे.विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पुस्तके देण्याचे शासनाचे आदेश आहेत. मात्र तरीसुद्धा चार महिने उलटूनही विद्यार्थांना पुस्तकं मिळालेली नाहीत. त्यामुळे अभ्यास कसा करावा असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे. तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण? असाही सवाल विचारला जात आहे.दरम्यान तीन वेळा शिक्षण विभागाकडे पुस्तकांची मागणी करून देखील पुस्तके उपलब्ध करण्यात आलेली नाहीत.

# नारायण राणेंच्या फार्म हाऊसच्या कंपाऊंडची भिंत तोडली

**रायगड (योगेश होळंब)-** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांच्या कर्नाळ्यातील फार्म हाऊसवर कारवाई करण्यात आली आहे. मुंबई-गोवा हायवेच्या रस्ता रुंदीकरणाआड येणाऱ्या फार्म हाऊसच्या कंपाऊंडची भिंत तोडण्यात आली.नारायण राणे यांच्या पत्नी नीलम राणे यांच्या नावावर असलेल्या 'निलेश फार्म' या फार्म हाऊसच्या कंपाऊंडची भिंत कारवाईत पाडण्यात आली.



या फार्म हाऊसमधील सुमारे २१ गुंठे जमीन ही मुंबई-गोवा हायवेच्या चौपदरीकरणासाठी संपादित केली जात आहे. चौपदरीकरणाच्या भूसंपदना मध्ये तारा गावातील गावकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली असून त्यांना मोबदला देण्यात आला. परंतु शासनामार्फत दुटप्पी भूमिका घेतली असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला होता. स्थानिक गावकऱ्यांची घरं ही तातडीने संपादित करण्यात आली असून राजकीय पुढाऱ्यांना मात्र यावेळी अभय देण्यात आल्याचं म्हटलं जात होतं.छोट्या जागेला मोठी किंमत तर मोठ्या जागेला कमी किंमत देण्यात आल्याचा आरोप आहे.

# मांजाने गळा चिरल्यावर 'ती' २० मिनिटं रक्ताच्या थारोळ्यात, एकही गाडी थांबेना

**पिंपरी चिंचवड (अभिजीत येरल्लु)-** चायनीज आणि नायलॉन मांजा किती घातक आहे, याची प्रचिती डॉक्टर महिलेच्या मृत्यूमुळे पिंपरी चिंचवडवासियांना पुन्हा आली आहे. मांजाने गळा चिरल्यानंतर वीस मिनिटं डॉ. कृपाली निकम रक्तांच्या थारोळ्यात पडून होती, मात्र एकही गाडी तिच्या मदतीला थांबली नसल्याचं समोर आलं आहे.सर्वोच्च न्यायालयाची कायमस्वरुपी बंदी असतानाही हा जीवघेणा मांजा बाजारपेठेत उपलब्ध होत असल्यामुळे प्रशासनाच्या ढिम्मपणाचाच हा बळी म्हणावा लागेल.डॉक्टर कृपाली निकमच्या आयुष्याची दोर नायलॉन मांजाने कापली. पुण्याहून भोसरीला दुचाकीवरुन परतताना रविवारच्या रात्री नाशिक फाट्याच्या उड्डाणपुलावर मांजाने कृपालीला गाठलं. गळा चिरल्यानंतर ती वीस मिनिटं रक्ताच्या थारोळ्यात पडली, मात्र एकही गाडी तिच्या मदतीसाठी थांबली नाही.मानेला जखम झाल्यामुळे कृपालीचा मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. वेळीच ती रुग्णालयात पोहचली असती, तर कदाचित कृपालीला जीवदान मिळू शकलं असतं. मात्र माणुसकी संपल्याचं जिवंत उदाहरण या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आलं.डॉ. कृपाली माझ्यासमोरच दुचाकीवरुन कोसळल्या. मी त्यांच्या मदतीला गेलो, तेव्हा त्यांच्या गळ्याला पतंगाचा मांजा अडकला होता. यात त्यांना गंभीर दुखापत झाली होती. रक्तस्त्रावही मोठ्या प्रमाणावर झाला होता. मी मदतीसाठी अनेक वाहनांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र कोणीच थांबायला तयार नव्हतं. २० मिनिटानंतर एक गाडी थांबली. शेवटी त्यांना



खासगी रुग्णालयात नेलं. त्यानंतर मी तिथून निघून गेलो. दुसऱ्या दिवशी त्यांच्या प्रकृतीची विचारणा करण्यासाठी गेलो असता, त्यांचा मृत्यू झाल्याचे समजलं, असं सिद्धार्थ बोरावके या तरुणाने सांगितलं. हा मांजा नेमका या उड्डाणपुलावर कसा पोहचला, कोण पतंग उडवत होतं की जाणीवपूर्वक कोणी इथे कोणी मांजा सोडून गेला, याचा पोलिसांनी शोध सुरु केला.याच वर्षी ९ जानेवारीला तीन वर्षांच्या चिमुकल्या हमजा खानचा डोळा कापला गेला होता.

सौजन्य व्हॉट्सअप




# मिरवणुकीत उपसभापती हत्तीवरुन पडले, दुखापत नाही

**गुवाहाटी (हिंदुस्थान समाचार)-** भाजप आमदार आणि आसाम विधानसभेचे नवनिर्वाचित उपसभापती अपघातातून सुखरुप बचावले. मिरवणुकीत हत्तीवरुन कृपानाथ मल्ला पडले, मात्र त्यांना सुदैवाने गंभीर दुखापत झालेली नाही. कृपानाथ मल्ला हे आसाममधील करीमगंज जिल्ह्यातील राताबरीमधून भाजपतर्फे आमदार आहेत. उपसभापतीपदी नियुक्ती झाल्यानंतर समर्थकांनी त्यांची मतदारसंघात हत्तीवरुन मिरवणूक काढण्यात आली.मिरवणूक सुरु असताना अचानक हत्ती सैरावैरा पळत सुटला. त्यामुळे माहूत आणि कृपानाथ मल्ला यांचा



तोल गेला आणि ते खाली पडले. समर्थकांनी लागलीच त्यांच्या दिशेने धाव घेत त्यांना उचललं.

# केबीसीमध्ये ६.४० लाख जिंकणारा स्पर्धक थेट रस्त्यावर आला, पण का?

**चंदीगड (विश्वास चव्हाण)-** टेलिव्हिजनवरील 'कौन बनेगा करोडपती' या रिॲलिटी शोमध्ये काही दिवसांपूर्वी आलेला दविंदर सिंग सध्या चांगलेच चर्चेत आहेत. केबीसीच्या गुरुवारी प्रसारित झालेल्या भागात दविंदर सिंग यांनी ६ लाख ४० हजार रूपये जिंकले होते. मात्र, एका वेगळ्याच कारणामुळे ते प्रकाशझोतात आले आहेत. फरीदाबाद येथे दविंदर सिंग हे 'आप की रसोई' या नावाने फिरते भोजनालय चालवतात. या भोजनालयाच्या माध्यमातून गरिबांना अवघ्या पाच रुपयांमध्येभरपेट जेवण दिले जाते. दविंदर सिंग यांनी केबीसीमध्ये अमिताभ बच्चन यांनाही 'आप की रसोई'बद्दल सांगितले होते. लहानपणापासून मी गुरुद्वारात गरजू आणि ज्येष्ठ व्यक्तींना मदत करणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हायचो. यावरूनच मला 'आप की रसोई' सुरु करण्याची कल्पना सुचली, असे दविंदर यांनी अमिताभ




यांना सांगितले. यापूर्वी दविंदर पुण्यात राहायला असतानाही अशाचप्रकारे समाजसेवा करायचे. ते हिंजवडी येथील इन्फोसिस कंपनीत कामाला होते. त्यावेळी 'सरस्वती अनाथालय शिक्षण' नावाच्या आश्रमशाळेत ते अन्नदान करायचे. मध्यंतरी दिल्लीत दोन लहान मुलांचा भुकबळी गेल्यानंतर दविंदर अस्वस्थ झाले होते. देशाच्या राजधानीत ही अवस्था असेल तर इतर ठिकाणी काय होत असेल, हा विचार सतत त्यांच्या मनात यायचा. अखेर दविंदर यांनी शक्य तितक्या लोकांना अन्नदान करायचा निर्धार केला. यातूनच 'आप की रसोई' ही संकल्पना जन्माला आली. विशेष म्हणजे दविंदर यांचे कुटुंबीयही त्यांना यामध्ये पूर्णपणे मदत करतात.दविंदर सिंह आणि त्यांचे कुटुंबीय आठवड्यातील एक दिवस आपल्या इनोव्हा गाडीतून जेवण घेऊन संपूर्ण शहरात फिरतात.

# प्रवर्ग राखीव, मग खुल्या गटातून निवड का, उपजिल्हाधिकाऱ्यांच्या निवडीला कोर्टात आव्हान

**औरंगाबाद (सुनील आढाव)-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या विविध पदांवर सर्वसाधारण गटातील नियुक्तीचा वाद हायकोर्टात पोहोचला आहे. मूळ राखीव प्रगर्वातील मात्र सर्वसाधारण गटातून परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या पाच महिला उमेदवारांनी, आयोगाच्या भूमिकेविरोधात याचिका दाखल केली आहे. तर न्यायालयाच्या आदेशाने झालेल्या तिघींच्या निवडीलाही आव्हान देण्यात आले आहे. तसेच एमपीएससीच्या मार्गदर्शक तत्वाविरोधातही दाद मागण्यात आली आहे.



डॉक्टर मिता चौधरी सध्या धुळ्यात सेल्स टॅक्स इन्स्पेक्टर या पदावर कर्यरत आहेत. त्यांनी यापेक्षा चांगल्या पदावर नोकरी मिळावी म्हणून त्यांनी २०१७ मध्ये पुन्हा एमपीएससी परीक्षा दिली. पल्लवी सोटे यांनीही २०१७ मध्ये एमपीएससीची परिक्षा दिली. या दोघीही विविध राखीव प्रवर्गातील आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व आणि मुख्य परीक्षेमध्ये या दोघी उत्तीर्ण झाल्या. त्यांची पदस्थापना बाकी होती.मिता चौधरी आणि पल्लवी सोटेंसह अनेक जणी ज्या विविध राखीव प्रवर्गातील असूनही त्यांनी खुल्या सर्वसाधारण गटातून अर्ज भरले होते. मात्र एमपीएससीने त्यांना जी मुलाखतपत्रे पाठविली त्यात मुलाखतीला येताना शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले. या दाखल्यामध्ये त्यांचा मूळ प्रवर्ग राखीव असल्यास, त्यांची खुल्या गटातून निवडीसाठी विचार केला जाणार नाही, असे निर्देश देण्यात आले होते. याच एमपीएससीच्या निर्देशाविरोधात मिता, पल्लवींसह ५ मुलींनी याचिका दाखल केली. यावर खंडपीठाने अंतरिम आदेशान्वये, याचिकाकर्त्यांच्या खुल्या सर्वसाधारण गटातून विचार करण्यास सांगितले. याआधारे नूतन खाडे या विद्यार्थिनींची उपजिल्हाधिकारीपदी, मिता चौधरी यांची उपशिक्षण तर सोटे यांची निवड मुख्याधिकारी म्हणून करण्यात आली. मात्र या कोर्टाच्या निर्णयाविरोधात खुल्या प्रवर्गातील उस्मानाबादच्या शिल्पा कदमसह एका विद्यार्थीनीने औरंगाबाद खंडपीठातच खुल्या प्रवर्गातून राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भरतीला स्थगिती मागितली.

# चिमुकलीशी अश्लिल चाळे, मनसेने पत्रकार परिषद घेऊन आरोपीला चोपलं

**ठाणे (राकेश गायकवाड)-** लहान मुलीशी अश्लिल चाळे करणाऱ्या परप्रांतीय आरोपीला पकडून, मनसेने भर पत्रकार परिषदेत त्याला हजर केलं. इतकंच नाही तर मीडियासमोर त्याला चोप दिला. मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव आणि पदाधिकाऱ्यांनी ठाण्यात पत्रकार परिषद घेत आरोपीला हजर केलं. ५३ वर्षीय आरोपी मूळचा बिहारचा आहे. आरोपी टेंपो चालवतो. या आरोपीने अडीच वर्षीय मराठी मुलीसोबत बलात्काराचा प्रयत्न केला. तो व्हिडीओ व्हायरल होत होता. त्याला मनसेने पकडलं, असं अविनाश जाधव यांनी सांगितलं.परप्रांतीय विकृतांवर तातडीने कारवाई करा, अन्यथा मनसे आपल्या स्टाईलने कारवाई करेल, असा इशाराही अविनाश जाधव यांनी दिला. या आरोपीने आतापर्यंत तीन लहान मुलींशी असं कृत्य केलं आहे. मात्र हा व्हिडीओ आल्याने त्याचं कृत्य समोर आल्याचं जाधव यांनी सांगितलं,ठाण्यात अडीच वर्षांच्या एका चिमुकलीशी अश्लील चाळे करणाऱ्या एका विकृताचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. हा प्रकार लक्षात आल्यानंतर स्थानिकांनी त्या विकृताला बेदम चोप दिला. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसही आरोपीचा शोध घेत होते. दुसरीकडे काँग्रेस नेते संजय निरुपम यांच्यासारख्यांना महाराष्ट्रातून हकलायला हवं. संजय निरुपम ही घाण आहे. मराठी आणि यूपी बिहारींच्यात वाद करुन राजकारण करायचं हा त्यांचा धंदा आहे.



# कृपाशंकर-निरूपम यांच्यात जुंपली
## काँग्रेसमधलं भांडण चव्हाट्यावर

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुंबई काँग्रेसमधलं भांडण पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलंय. मुंबई आणि उत्तर भारतीयांबद्दल संजय निरूपम यांनी केलेल्या वक्तव्याशी काँग्रेसचा काहीही संबंध नाही असं सांगत काँग्रेसचे नेते कृपाशंकर सिंग यांनी निरूपम यांना घरचा अहेर दिलाय. काँग्रेसपक्षाची भूमिका समाजात फूट पाडणारी नाही, निरूपम यांचं मत काँग्रेस नेत्यांना पटणारे नाही असंही ते म्हणाले. 'उत्तर भारतीय लोकच मुंबई चालवतात, त्यांनी



ठरवलं तर मुंबई-महाराष्ट्र ठप्प होईल' असं संतापजनक वक्तव्य निरुपम यांनी नागपुरमध्ये बोलताना केलं होतं.संजय निरूपम यांच्या या वक्तव्याचे मुंबईत तीव्र पडसाद उमटलेत. मनसेनं त्यांना भटक्या कुत्र्याची उपमा देत आंदोलन केलं. याचा फायदा घेत कृपाशंकर सिंग यांनी पुन्हा एकदा निरूपम यांच्याविरूद्ध आघाडी उघडलीय. मुंबई काँग्रेसमध्ये निरूपम यांच्याविरूद्ध सर्व गट असं वातावरण निर्माण झालंय.

# नाना पाटेकरांची पत्रकार परिषद अर्ध्या मिनिटात आटोपली

**मुंबई (प्रतिनिधी)-** अभिनेत्री तनुश्री दत्ता हिने केलेल्या लैंगिक छळाच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी अभिनेता नाना पाटेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू मांडली. मी दहा वर्षांपूर्वी जे बोललो होतो, तेच सत्य आहे, असे यावेळी नाना पाटेकर यांनी सांगितले. मात्र, वकिलांनी सांगितल्यामुळे मी यावर अधिक बोलणार नाही, अशी भूमिका घेत नाना पाटेकर यांनी ही पत्रकार परिषद अवघ्या अर्ध्या मिनिटात आटोपती घेतली.मला प्रसारमाध्यमांशी बोलायला आवडते. मी नेहमीच तुमच्याशी संवाद साधतो. मात्र, सध्या माझ्या वकिलांनी मला प्रसारमाध्यमांशी बोलायला मनाई केली आहे. अन्यथा मी कधीच यावर प्रतिक्रिया दिली असती, असे नाना पाटेकर यांनी सांगितले.



# ऐन दिवाळीत सोने महागणार?

**नागपूर (दयानंद चौरासिया) - अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या घसरणीचा परिणाम सोन्याच्या किमतीवर पडला आहे. मागील ४७ दिवसांमध्ये सोन्याने १४०० रुपयांची वाढ अनुभवली आहे. शनिवारी दहा ग्रॅम सोन्यासाठी ग्राहकांना ३१ हजार ६०० रुपये मोजावे लागले. सातत्याने सुरू असलेली दरवाढ कायम राहणार असून दिवाळीला सोन्याची झळाळी ३५ हजारांवर पोहोचणार असल्याचे सराफांचे म्हणणे आहे.**



महिनाभरापूर्वी सोने ३० हजारांवर होते, तेव्हा बाजारात ग्राहकांची खरेदी वाढली होती. मात्र, भाव वाढताच ते कमी होण्याच्या अपेक्षेने ग्राहकांनी खरेदी थांबविली. असे असले तरी सध्या आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी पाहता सोन्याचे भाव कमी होण्याची शक्यता नाही. उलट दसरा, दिवाळीत भाव पुन्हा उच्चांकावर जाण्याची शक्यता आहे. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयांचे अवमूल्यन झाल्यास सोन्यात वाढ होते.

पण, जुलै आणि ऑगस्ट महिना अपवाद ठरला. त्यावेळी अमेरिकेत सोन्याला मागणी कमी असल्यामुळे रुपयाचे अवमूल्यन झाल्यानंतरही सोन्यात घसरण होऊन भाव ३० हजारांच्या खाली आले होते. त्यानंतर अमेरिकन बाजारात उलाढाल वाढल्यामुळे सोन्याचे भाव पुन्हा वाढले.

आता डॉलरचे मूल्य वाढल्यामुळे सोन्याचे भाव निरंतर वाढत आहेत. यंदाच्या सणासुदीत भारतीय बाजारात ग्राहकांना सोने जास्त भावातच खरेदी करावे लागणार आहे. उन्हाळ्यात लग्नसराईत सोन्याने ३० हजारांचा पल्ला गाठला. त्यानंतर भावात घसरण होऊन १७ ऑगस्ट रोजी सोने ३० हजारांच्या खाली आले. ९ सप्टेंबरला भाव २९ हजार ९०० रुपये होता. जुलै आणि ऑगस्ट हे दोन महिने वगळल्यास सातत्याने दरवाढ सुरू आहे.

### जीएसटीसह 32 हजार

दहा ग्रॅम सोन्यामागे ३१ हजार ६०० रुपये दर असला तरी जीएसटीसह ही किंमत ३२ हजार रुपये होत असल्याची माहिती सराफा व्यापारी राजेश रोकडे यांनी दिली.

सोन्याच्या दरांमध्ये सुरू असलेली ही वाढ वर्षाच्या शेवटपर्यंत कायम राहणार असून दिवाळीमध्ये सोने महाग होणार आहे. साधारणपणे हिंदूंमध्ये तुळशी विवाहानंतर लग्नसराई सुरू होते. ती उन्हाळ्यापर्यंत राहते. सणासुदीचे दिवस संपल्यानंतर सुरू होणारी लग्नसराई लक्षात घेता सोनेखरेदी शक्य तितक्या लवकर करणे हितावह असल्याचे चित्र आहे.

# नालासोपारा स्फोटकांप्रकरणी लंकेश हत्याकांडातील काळेसह तिघांना अटक

***मुंबई (राकेश गायकवाड)– नालासोपारा स्फोटके प्रकरणात सहभाग समोर येताच, एटीएसने पत्रकार गौरी लंकेश हत्याकांडातील आरोपी अमोल काळेसह अमित बद्दी, गणेश मिस्कीन अशा तिघांचा ताबा घेत त्यांना अटक केली. विशेष न्यायालयाने शनिवारी तिघांना १२ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.***

नालासोपारा स्फोटकांप्रकरणी वैभव राऊत, शरद कळसकर, सुधन्वा गोंधळेकर, श्रीकांत पांगारकर, अविनाश पवार, वासुदेव सूर्यवंशी आणि लीलाधर उर्फ विजय उर्फ लंबू उखडूर्ली लोधीसह गौरी लंकेश हत्याकांडातील आरोपी सुजीत कुमार आणि भरत कुरणे यांना अटक करण्यात आली होती. या नवीन अटकेमुळे हा आकडा १२ वर पोहोचला आहे.



शनिवारी दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) तिघांना विशेष न्यायालयात हजर केले. हिंदुत्ववाद्यांकडून जप्त केलेल्या डायरींमुळे या तिघांचा सहभाग समोर आल्याचे एटीएसने न्यायालयात सांगितले. त्या डायरीही न्यायालयात सादर करण्यात आल्या. तसेच सूर्यवंशीने गुन्ह्यात कर्नाटकच्या धारवडमधून वाहने चोरी केली. या चोरीत या तिघांचाही सहभाग असल्याचे त्यांनी न्यायालयात सांगत, तिघांच्या कोठडीत १४ दिवसांची वाढ करण्याची मागणी केली. आरोपींचे वकील संजीव पुनाळेकर यांनी याला विरोध केला. चोरी प्रकरणावेळी तिघेही न्यायालयीन कोठडीत होते. त्यामुळे त्यात त्यांचा सहभाग असणे शक्य नाही. शिवाय, त्यांचा काय सहभाग आहे, हे अद्याप सांगण्यात आलेले नाही.

# मान्सून मुंबईसह महाराष्ट्रातून परतला
## ऑक्टोबर हीटचा तडाखा वाढणार

**मुंबई (सम्यक कासारे)–** उत्तर भारतातून परतीच्या प्रवासाला निघालेल्या मान्सूनने शनिवारी अखेर मुंबईसहमहाराष्ट्रातूनही माघार घेतली; तशी घोषणाच भारतीय हवामानशास्त्र विभागाने केली. दक्षिण कोकणातून परतीचा प्रवास करत पुढे सरकलेला मान्सून कर्नाटकात आहे. तर दुसरीकडे अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे रूपांतर येत्या २४ तासांत चक्रिवादळात होण्याची शक्यता आहे. परिणामी, समुद्र खवळलेला राहणार असल्याकारणाने मच्छीमारांनी मासेमारीसाठी समुद्रात उतरू नये, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. महत्त्वाचे म्हणजे मान्सूनने आता काढता पाय घेतल्याने ऑक्टोबर हीटचा तडाखा आणखी वाढणार असून, नागरिक उकाड्यासह उन्हाने त्रस्त होणार आहेत.



भारतीय हवामान शास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नेर्ऋत्य मौसमी पाऊस उत्तर बंगालच्या उपसागराचा उर्वरित भाग, छत्तीसगड, महाराष्ट्र, संपूर्ण तेलंगणा, मध्य अरबी समुद्राचा बहुतांश भाग, आंध्र प्रदेशचा किनारा, मध्य अरबी समुद्र आणि कर्नाटकाच्या काही भागांतून माघारी परतला आहे. गेल्या २४ तासांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली आहे. विदर्भात हवामान कोरडे नोंदविण्यात आले. ७ ते १० ऑक्टोबरदरम्यान कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाडा, विदर्भात हवामान कोरडे राहील. रविवारसह सोमवारी मुंबई शहर, उपनगरावरील आकाश निरभ्र राहील. मुंबईचे कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३७, २४ अंशाच्या आसपास राहील.

# Opinion Poll 2018 : राहुलची जादू चालणार
## भाजपाला तीन राज्यांमध्ये पराभवाचा धक्का

**नवी दिल्ली (पीटीआय)-** आगामी लोकसभा निवडणुकीची रंगीत तालीम मानल्या जात असलेल्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या तारखांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने शनिवारी केली. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, मिझोराम आणि तेलंगण या पाच राज्यांमध्ये १२ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर या कालावधीत मतदान होणार असून, ११ डिसेंबरला मतमोजणी करण्यात येणार आहे. पाच राज्यांतील निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर एक सर्वे समोर आला आहे. या सर्वेमध्ये काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांची जादू चालणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 'इंडिया टुडे' च्या सर्वेनुसार भाजपाच्या चिंता वाढली आहे तर काँग्रेससाठी आनंदाची बातमी आहे. या सर्वेनुसार, राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये सत्तापरिवर्तन होण्याची शक्यत वर्तवण्यात आली आहे. तिन्ही राज्यांमध्ये सध्या भाजपची सत्ता आहे. पण या तिन्ही राज्यांमधून भाजपची सत्ता जाऊ शकते. तसंच



काँग्रेसला या राज्यांमध्ये बहुमत मिळू शकतं, असा अंदाज सर्व्हेतून व्यक्त करण्यात आला आहे.

२००३ पासून भाजपा मध्य प्रदेशात सत्तेत आहे. मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांची प्रतिमा चांगली असली तरी 'व्यापम' घोटाळा, शेतकऱ्यांवर झालेला गोळीबार, १५ वर्षे सत्तेत असल्याने सरकारच्या विरोधातील नाराजी हे घटक भाजपसाठी घातक ठरू शकतात. मध्य प्रदेशात विधानसभेच्या एकूण २३० जागा आहेत. या निवडणुकीत काँग्रेसचा १२२ जागांवर विजय होईल. तर भाजपला १०८ जागा मिळतील, असा अंदाज सर्व्हेतून व्यक्त करण्यात आला आहे. असं झालं तर १५ वर्षांनंतर मध्य प्रदेशात काँग्रेसचे जोरदार पुनरागमन होईल.

दुसरीकडे छत्तीसगडमध्ये भाजपाला मोठ्या पराभला सामोर जाऊ लागू शकते असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. छत्तीसडमधील एकून ९० जांगापैकी ४७ जागांवर विजय मिळवून काँग्रेस सत्तेवर येईल असा दावा या सर्वेमध्ये करण्यात आला आहे. भाजपाला ४० जागांवर समाधान मानावं लागेल. यामुळे छत्तीसगडमध्येही काँग्रेसची सत्ता येण्याची शक्यता आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत कमी मतांच्या आधारे भाजपने सत्ता कायम राखली होती.

राजस्थानात १९९३ पासून भाजपा आणि काँग्रेसला आलटून पालटून सत्ता मिळाली आहे. ही पंरपरा कायम राहिल्यास यंदा काँग्रेसला संधी आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष अमित शहा आणि मुख्यमंत्री वसुंधराराजे यांनी सत्ता कायम राखण्याकरिता जोर लावला आहे. सर्वेनुसार, राजस्थानमधील २०० जागांपैकी भाजपाला फक्त ५६ जागा मिळणार आहेत. या निवडणुकीत काँग्रेसच्या मतांमध्येही वाढ होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. राजस्थानमध्ये काँग्रेसला ५० टक्के मते मिळत तर भाजपाला ३४ टक्के. १४२ जागावर विजय मिळवत काँग्रेस राजस्थानमध्ये सत्तेचा दावा ठोकण्याची शक्यता सर्वेतून व्यक्त करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रात हुक्काबंदी लागू



**मुंबई (अमोल गुडेकर)-** महाराष्ट्रात यापुढे हुक्का पार्लर चालणार नसल्याचा अतिशय महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घालण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाला राष्ट्रपतींकडूनही मंजुरी देण्यात आली आहे. २००३ मध्ये लागू केलेल्या सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादनं अधिनियमानुसार या निर्णयाचं उल्लंघन केल्यास संबंधीत दोषींना एक लाख रुपयांचा दंड आणि तीन वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. हुक्का पार्लरवर पूर्णपणे बंदी घालणारं महाराष्ट्र हे देशातील दुसरं राज्य ठरलं आहे. यापूर्वी गुजरातमध्ये हा निर्णय लागू करण्यात आला होता.

# सिडको अर्बन हाट येथे 'दसरा मेळा २०१८' चे आयोजन

**मुंबई (धनश्री सट्टा)-** गुजरात हस्तकला उत्सवात मिळालेल्या नागरिकांच्या अभूतपूर्व प्रतिसादानंतर सिडकोतर्फे अर्बन हाट येथे दसरा मेळ्याचे आयोजन करण्यात अलो आहे. १० ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. अर्बन हाटच्या परंपरेप्रमाणे या मेळ्यातही महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, आसाम, गुजरात, पश्चिम बंगाल, तमिळनाडू अशा विविध राज्यांतील कारागीर आणि कलाकार सहभागी होऊन आपली उत्पादने प्रदर्शनार्थ मांडणार आहेत. हातमाग, हस्तकला, धातूकाम, चर्मोद्योग, ताग काष्ठ कला अशा विविध उद्योगांशी संबंधित दर्जेदार उत्पादने या वेळी विक्रीकरिता उपलब्ध असतील. या कालावधीत दर शुक्रवार, शनिवार आणि रविवार, सायं. ७ नंतर सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहेत. याशिवाय फुड प्लाझा विभागा अंतर्गत कोल्हापुरी, मालवणी, दक्षिण भारतीय, राजस्थानी असे प्रांतोप्रांतीचे खाद्यपदार्थ खवय्यांच्या रसनातृप्तीसाठी सज्ज असतील. अर्बन हाट येथील दसरा मेळ्यास भेट दिल्यावर नागरिकांचा सणासुदीचा आनंद द्विगुणित होईल, याबाबत शंका नाही.



# डेंग्यू डासांच्या डंखाने संपूर्ण विदर्भ बेजार

**नागपूर (प्रतिनिधी)-** दुपारी सक्रीय असलेल्या डेंग्यूच्या डासांनी मारलेल्या डंखामुळे संपूर्ण विदर्भाला तापेची हुडहुडी भरली आहे. या कालावधीत गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा सर्वाधिक रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. डेंग्यूमुळे दगावणाऱ्या मृतांचा आकडा कमी दाखवला जात असला तरी प्रत्यक्षात या आजाराची लागण झालेल्यांची संख्या मात्र कितीतरी पटीने अधिक आहे. विदर्भात घरोघरी सर्दी, खोकला, तापेसह किमान एकाने तरी खाट धरली आहे. एडीस इजिप्ता डासाने चावा घेतल्यावर होणाऱ्या या आजारावर नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने तातडीने



फवारणी करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने काही भागात फवारणीला गती दिली गेली असली तरी आरोग्य खात्यांकडे फवारणीसाठी अपुऱ्या मनुष्यबळासह इतर सुविधांच्या अभावामुळे या आजारावर अद्यापही नियंत्रण मिळवता आले नाही. गेल्यावर्षी या कालावधीत विदर्भात डेंग्यूचे ५,०९८ रुग्ण आढळले होते. त्यातील १३६ रुग्णांना लागण झाल्याचे स्पष्ट झाले. यंदा याच कालावधीत १५,१५३ संशयित रुग्ण आढळले. त्यातील ९२३ जणांना डेंग्यू झाल्याचे निष्पन्न झाले. पूर्व विदर्भात गेल्या आठवड्यात तब्बल १२४ नवीन रुग्णांची नोंद आरोग्य विभागाने घेतली. त्यात सर्वाधिक ४७ रुग्ण चंद्रपूर महापालिका आणि ३९ नागपूर महापालिका हद्दीत आढळले. नुकतेच आरोग्य विभागाकडून डेंग्यूच्या संशयित मृत्यूचे अंकेक्षण केले गेले. त्यात वर्धा जिल्ह्यातील पाच, नागपूर ग्रामीणमधील दोन अशा एकूण सात जणांचा मृत्यू हा डेंग्यूने झाला आहे. विदर्भातील नागपूर आणि चंद्रपूर महापालिकेत सर्वाधिक डेंग्यूच्या रुग्णांची नोंद घेण्यात आली आहे. परंतु तेथील महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून एकही मृत्यू झाला नसल्याचा अहवाल आरोग्य विभागाकडे पाठवण्यात आला.